0 5 OCT 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'राणादा बदाम थंडाई'ची शाखा

## स्टार्टअपअंतर्गत उपक्रम; 'एसयूके फाउंडेशन'तर्फे १५ नवउद्योगांना बळ



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नवउद्योगांना पाठबळ उपक्रमांतर्गत 'राणादा बदाम थंडाई'चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संभाजीराजे छत्रपती, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. विलास शिंदे, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. एम.एस. देशमुख, धनंजय वडेर, डॉ. प्रकाश पवार.**

कोल्हापूर, ता. ४ : महाराष्ट्र स्टार्टअपच्या माध्यमातून नवसंकल्पना व नवीन व्यवसायाच्या संधी युवकांना उपलब्ध होत आहेत. राज्यातील नावीन्यपूर्ण संकल्पना व नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नावीन्यता सोसायटी व शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन या सेक्शन ८ कंपनीमार्फत १५ नवउद्योगांच्या पंखांना बळ दिले आहे. त्याअंतर्गत धनंजय वडेर यांनी 'राणादा फुडस् एलएलपी' ही कंपनी सुरू झाली असून, या कंपनीतर्फे 'बदाम थंडाई' हे पेय तयार केले आहे. विद्यापीठात याची शाखा आज सुरू झाली आहे.

राणादा बदाम थंडाई आता प्रदूषणविरहित गाडीमधून महाराष्ट्रात उपलब्ध करून देणार आहेत. याचा उद्देश एकच आहे की कमीत कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त रोजगार मिळवून देता येईल. 'राणादा थंडाई' या शून्यप्रदूषण गाडीचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र येथे झाले.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, 'अशाप्रकारचे पारंपरिक उद्योग नव्या स्वरूपात तरुणाई आणत असून स्वतःचा व्यवसाय सुरू करून त्यात इतरांना व्यवसाय देण्याचे काम करत आहे. ही आनंदाची बाब आहे. अशा व्यवसायाच्या फ्रेन्चाइजी युवकांनी घेतल्यास बेरोजगारी कमी होण्यास नक्कीच मदत होईल.' या समारंभास प्रमुख उपस्थित असणारे छत्रपती संभाजीराजे यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले. ते म्हणाले, 'या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून नवीन स्टार्टअप ना प्रोत्साहन मिळेल आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. असे नव्या या पद्धतीचे व्यवसाय सुरू केल्यास त्यास आपण नक्कीच प्रोत्साहन देऊ.

यावेळी आमदार ऋतुराज पाटील उपस्थित होते. त्यांनीही या उपक्रमास शुभेच्छा देऊन शासनाकडूनही मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, साहचर्य केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश पवार आदी उपस्थित होते.

### पीएच.डी., एम. फिल.साठी अर्ज भरण्यास प्रारंभ

कोल्हापूर : एम. फिल आणि प्री.पीएच.डी.साठी प्रवेश परीक्षा अर्ज भरण्यास आजपासून प्रारंभ झाला. १३ पर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. त्यानंतर विलंब शुल्कासह ता. १७, तर अतिविलंब शुल्कासह ता. २० पर्यंत अर्ज भरता येणार आहेत. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर एक्झाम सेक्शन सर्क्युलर या ठिकाणी हे उपलब्ध आहे. २३ नोव्हेंबरपासून या परीक्षेला सुरवात होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पत्रकाद्वारे दिली.

लोकमत

# प्री-पीएचडी परीक्षेसाठी अर्ज करा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाद्वारा विविध अभ्यासक्रमाच्या एम. फिल., प्री-पीएचडी कोर्सवर्क अभ्यासक्रमाच्या परीक्षा २३ नोव्हेंबरपासून ऑफलाइन स्वरूपात घेण्यात येणार आहे. त्यासाठी अतिविलंब शुल्काने अर्ज भरण्याची अंतिम तारीख २० ऑक्टोबर आहे. विद्यापीठाने अधिकार मंडळाच्या ठरावानुसार या परीक्षांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवारपासून सुरू केली आहे. त्यात विनाविलंब शुल्काने अर्ज भरण्याची अंतिम तारीख १४ ऑक्टोबर, तर विलंब शुल्कासह अर्ज करण्याची अंतिम मुदत १७ ऑक्टोबरपर्यंत आहे. या परीक्षेचे स्वरूप वर्णनात्मक आहे.

लोकमत

# 'एनएसएस'मुळे विद्यार्थी घडतात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कसबा बावडा :** राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन आहे. विद्यार्थ्यांची जडण-घडण व व्यक्तिमत्त्व विकासात एनएसएसचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. संतोष चेडे, अधिष्ठाता डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. राहुल पाटील, डॉ. नवनीत सांगले, प्रा. संकेत शिंदे उपस्थित होते.

तरुण भारत

# माहिती अधिकार कायद्याची व्यापक जनजागृती आवश्यक

**कोल्हापूर :** माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग टाळून या कायद्याबद्दल व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जि. प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा देसाई यांनी केले.

जागतिक माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्हा परिषद व शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंपर्क विभागामार्फत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव, सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते. यावेळी देसाई म्हणाल्या, माहितीचा अधिकार कायद्याचे महत्त्व अधिकाधिक घटकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. याकामी पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. सध्या काही लोक या कायद्याचा दुरुपयोग करत आहेत. दरम्यान या कार्यशाळेत माहितीचा अधिकार पुस्तिकेचे वाटप केले. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना या अधिनियमाची माहिती व्हावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

05 OCT 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# अजून वेळ गेली नाही!

जागतिक तापमान वाढ आणि त्याचे दुष्परिणाम हा सध्या नेहमी चर्चेत येणारा विषय आहे. या वर्षीच्या पावसाने तर जागतिक तापमान वाढीमुळे होणाऱ्या परिणामांचे स्पष्ट संकेत दिले आहेत. 'इंटरगव्हर्मेंटल पॅनेल फॉर क्लायमेट चेंज' या संस्थेने युनोला अहवाल दिला आणि त्यात पर्यावरण बदलांमुळे होणाऱ्या गंभीर परिणामांचे इशारे दिले आहेत. अनेक राष्ट्रांनी हा विषय कृतीपेक्षा चिंतेचा बनवला आहे. या प्रश्नावर कृती करण्यासाठी समित्या गठीत केल्या आहेत. भारतातील काही राज्यांनीही पर्यावरणविषयक समस्यांच्या अभ्यासासाठी समित्या गठीत केल्या आहेत. समित्यांच्या अहवालांची प्रतीक्षा आहे. अशा समित्यांचे अहवाल येणार आणि त्यानंतर कृती होणार. या अहवालांची वाट पहायला, निसर्ग मात्र तयार नाही. त्याने मागील काही वर्षांपासून आपले वर्तन बदलले आहे. अचानक येणारा पाऊस, अरबी समुद्रासारख्या सुरक्षित भागात वारंवार येणारी वादळे, अनियमित पावसाने निर्माण होणाऱ्या दुष्काळाची आणि पुराची परिस्थिती, या सर्व गोष्टी आयपीसीसीच्या अहवालानुसार आहेत. यापेक्षा गंभीर समस्या उद्‌भवणार असा अंदाज आहे. यावर्षी चीनमध्ये आलेला दुष्काळ, पाकिस्तानमधील पूर, पुणे, बंगळूरु, नाशिकसारख्या सुरक्षित शहरात साठून राहिलेले पाणी याचीच साक्ष देतात.

या सर्व गोष्टी आठवण्याचे कारण शुक्रवार दिनांक ३० सप्टेंबर २०२२ ला कोल्हापूर परिसरात झालेले वादळ. दुपारी पावणेचारची वेळ. अचानक ढग दाटून आले. वेगाने वारे आले. या वाऱ्याचा वेग किती होता, हे नेमके अजून समजलेले नाही. मात्र, वाऱ्याचा वेग प्रचंड होता. वारा आल्यानंतर त्याने चक्रवाताचे रूप धारण केले. हे वादळ केवळ सात मिनिटांसाठी आले. सात मिनिटात त्याने होत्याचे नव्हते केले. त्यातही झाडांचे अतोनात नुकसान केले. या झाडांचे निरीक्षण केले असता, काही महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या. हा चक्रवात सैन्य दलाचा परिसर, कृषी महाविद्यालय, राजाराम महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ असलेल्या केवळ पाच किलोमीटरच्या परिघात आढळून आला. या परिसरातील ४२५ एकरातील पाहणीत पाचशेच्यावर झाडांचे नुकसान झालेले आढळून आले. या झाडांचे निरीक्षण केले असता, काही झाडांचे केवळ बुंधे राहिले आहेत. सर्व बाजूच्या फांद्या मोडून गेल्या आहेत. पन्नासेक झाडे उन्मळून पडली आहेत. पडलेली बहुतांश झाडे ही ग्लिरिसिडीयाची होती. त्यानंतर आफ्रिकन ट्युलिपची किंवा पॅथोडियाची असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतरचा क्रमांक रेन ट्रीचा. त्यानंतर काही झाडे निलगिरीची होती. यातील केवळ चार झाडे देशी वाणांची असल्याचे दिसून आले. यातील एक सागाचे, एक कडुलिंबाचे, एक शिरीष आणि एक बाभळीचे आहे. जी झाडे उन्मळून पडलेली होती किंवा ज्यांच्या फांद्या तुटून पडल्या आहेत, त्या झाडांमध्ये बहुतांश झाडे ही विदेशी वाणाची आहेत. रेन ट्री, ग्लिरिसिडीया, सुबाभूळ, ऑस्ट्रेलियन, अॅकेशिया, सोनमोहोर, निलमोहोर या झाडांचे मोठे नुकसान झालेले दिसून आले. देशी वाणांच्या लहानमोठ्या झाडातील चिंच, आवळा, जांभूळ, आंबा, फणस इत्यादी झाडांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. फळबागातील नारळ, चिक्कूच्या झाडांचेही नुकसान झाले नाही. त्यांच्या फांद्या तुटल्या नाहीत किंवा उन्मळून पडलेल्या नाहीत. जुन्या सागाच्या दोन-तीन झाडांच्या फांद्या तुटलेल्या आहेत. बाभूळ आणि कडुलिंबाचे केवळ एक झाड उन्मळून पडलेले दिसून आले. विशेष म्हणजे अंगावर पक्ष्यांसाठी खोबण्या घेऊन राहणाऱ्या शिरीषच्या झाडाच्याही फांद्यांचे नुकसान झालेले आढळून आले नाही. काजू हा विदेशी वाण, मात्र इथल्या मातीशी नाळ जोडून बसलेला. काजूंच्या झाडांचेही नुकसान झालेले नाही.

या सर्व घटनाक्रमामध्ये दोन गोष्टी अधोरेखित होतात. जागतिक तापमान वाढीचे आता दृश्य दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. यापूर्वी एवढ्या कमी वेळाचे आणि एवढे विनाशकारी वादळ कधीच अनुभवले नाही. या वादळाने केवळ सात मिनिटात अनेक वर्षे उंच शेंडे घेऊन मिरवणारे निलगिरीसारखे वृक्ष भुईसपाट केले आहेत. अशा प्रकारचे वादळ येणे आणि एवढे मोठे नुकसान होणे हा जागतिक तापमानवाढीचाच परिणाम आहे. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे या वादळात ज्या झाडांचे नुकसान झाले, त्यातील नव्व्याण्णव टक्के वृक्ष हे विदेशी आहेत. पर्यावरणतज्ज्ञ अनेक वर्षांपासून विदेशी झाडांची लागवड करणे थांबवले पाहिजे, असा आग्रह धरत आहेत; तरीही विदेशी वृक्षांची लागवड मात्र थांबत नाही. गुलमोहोर, सोनमोहोर आणि आफ्रिकन ट्युलिपची झाडे केवळ फुलल्यानंतर चांगली दिसतात म्हणून लावतात. रेन ट्री, ग्लिरिसिडीया भरभर वाढतात म्हणून लावतात. सुबाभूळ, आफ्रिकन ट्युलिप झाडे आता लावण्याची गरज नाही, वाऱ्यामुळे त्याच्या बिया सर्वत्र पसरून त्याची झाडे वाढू लागली आहेत. या झाडांची वाढ वेळीच रोखण्याची गरज आहे. सामाजिक वनीकरण विभागामार्फत आजही गुलमोहोरासारख्या वृक्षांच्या रोपांची निर्मिती करून लागवडीसाठी उपलब्ध करून देण्यात येतात. याउलट अनेक वृक्ष दुर्मिळ होत चालले आहेत. त्यांची रोपे मात्र बनवून उपलब्ध होत नाहीत. शिवण, बेहडा, बिबा असे अनेक औषधी वनस्पती लावण्याची गरज असतानाही ती लावण्याचा प्रयत्न होत नाही. कडूलिंबाची झाडे लावली जातात आणि त्यांचे गुण माहीत असणारे अनेक लोक त्याच्या फांद्यांचा विध्वंस करतात. अनेक कडुलिंबाच्या झाडांना वाढू देण्याचे सौजन्य दाखवले जात नाही. हिवरासारख्या झाडावर पक्षी आवडीने घरटे बांधतात. मात्र, हिवराला, बाभळीला आणि बोरीला त्यांच्या काट्यामुळे जगू दिले जात नाही. निसर्गानेही आता स्थानिक वाणांची लागवड करा असे सांगितले आहे. वाढलेले विदेशी वृक्ष तोडण्याची गरज नाही, पण नव्याने झाडे लावताना स्थानिक वृक्षच लावायला हवेत. वेळीच कृती करायला हवी, अजून वेळ गेली नाही!

संपर्क : ९६७३७८४४००